# वृत्त अहवाल

मुंबई
११ जानेवारी, २०१९

एसएनडीटी महिला विद्यापीठाचा ६८ वा दीक्षान्त समारंभ दिनांक ११ जानेवारी, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता सर सीताराम तथा लेडी शांताबाई पाटकर दीक्षान्त सभागृह, चर्चगेट येथे साजरा झाला.

भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी १९१६ साली स्थापन केलेल्या या विद्यापीठाने महिलांसाठी एक दर्जेदार शिक्षण केंद्र निर्माण केले आहे. **शिक्षणातून महिला सक्षमीकरण** हे विद्यापीठाचे ध्येय आहे. **''संस्कृता स्त्री पराशक्ती''** हे बोधवाक्य असलेल्या एसएनडीटी महिला विद्यापीठाने महिला शिक्षण व सक्षमीकरणाचे दैदिप्यमान शतक ओलांडले आहे.

या दीक्षान्त समारंभात विद्यापीठातील १२,६४४ विद्यार्थिनींना पदवी व पदविका प्रदान करण्यात आल्या. त्यामध्ये ९,९०२ पदवी, २,१५८ पदव्युत्तर, १७४ पदव्युत्तर—पदविका आणि ३८१ पदवी/प्रमाणपत्रांचा समावेश होता. या समारंभात एकूण २९ पीएच.डी. प्राप्त विद्यार्थिनींना पदव्या प्रदान करण्यात आल्या. २११ दात्यांनी स्थापित केलेली ७१ सुवर्णपदके, १ रौप्य पदक ११८ विद्यार्थिनीना देण्यात आली. या वेळी एकूण १४३ पदवी व पदवीका ४ विद्याशाखाअंतर्गत प्रदान करण्यात आल्या.

विद्यापीठाचे प्र—कुलगुरू डॉ. विष्णु मगरे यांनी समारंभाच्या अतिथींचा परिचय करून दिला आणि विद्यापीठाचा दीक्षान्त अहवाल सादर केला.

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरु प्रा. शशिकला वंजारी यांनी समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविले आणि विद्यार्थीनीना पारितोषिके प्रदान केली.

डॉ. ज्योत्स्ना कुकडे (स्त्री रोग विशेषज्ञ विवेकानंद हॉस्पिटल, लातूर) यांनी विद्यापीठाची मानद डी. लिट पदवी स्विकारताना त्यांच्या जीवन कार्याचा आढावा घेतला आणि विद्यापीठाला धन्यवाद दिले.

या समारंभाच्या मुख्य अतिथी पद्मश्री निवेदिता रघुनाथ भिडे (उपाध्यक्ष, विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी) यांनी त्यांना प्रादन करण्यात आलेल्या डी.लिट पदवी करीता विद्यापीठाला धन्यवाद दिले. विद्यार्थीनीना संदेश देताना त्यांनी सांगितले ''यापुढील शिक्षण हे जीवनातून आत्मसात करा समाजातील आदिवासी कडून आपल्या धर्म आणि संस्कृती बद्यल जाणून घ्या. हा समाज हेच तुमचे विद्यापीठ होवो. तुम्ही निवडलेल्या क्षेत्रामध्ये अतिउत्तम काम करा आपल्या कामातूनच आपल्यातील देवत्वाची प्रचिती जगाला करून देण्याचा निश्चय करा. सर्वाना बरोबर घेऊन कार्य करा आणि स्वता:पेक्षा कुटूंब, समाज आणि देशहिताला प्राधान्य दया. यातूनच तुम्हाला स्वामी विवेकानंदाना अपेक्षित असलेल्या शाश्वत आनंदाचा लाभ होईल.''

एसएनडीटी महिला विद्यापीठामध्ये ३९ विद्यापीठ विभाग, ११ संचलित महाविद्यालये आणि संस्था, २ केंद्रे, १८३ संलग्नित महाविद्यालये, १ स्वायत्त महाविद्यालयाचा आणि विद्यापीठ मान्यताप्रात ६ पीएच.डी. रिर्सच संस्थांचा समावेश आहे. एसएनडीटी महिला विद्यापीठाची व्याप्ती ७ राज्ये व १ केंद्रशासित प्रदेशात असून यात ५०,००० विद्यार्थीनींसह ११०० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत.

या समारंभामध्ये डॉ. सुभाष वाघवारे, संचालक, परिक्षा आणि मुल्यमापन मंडळ यांनी बक्षिसे घोषित केली आणि आभार प्रदर्शन केले.

link: www.estv.in/sndt